महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २८७ वा | दिनांक : १५/०९/२०२५ | वार : सोमवार

## नोंदी असणाऱ्यांनाच ओबीसी प्रमाणपत्र मिळणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई** : राज्यातील ओबीसी समाजाला कुठलाही धोका नाही. एकही नकली व्यक्ती ओबीसींमध्ये समाविष्ट होणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. "नकली म्हणजे जो ओबीसी नाही, तो कधीच या प्रवर्गात समाविष्ट होणार नाही. त्यासाठी सरकारने जारी केलेल्या जीआरमध्ये स्पष्ट तरतूद केली आहे," असा पुनरुच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या आरोपांवर उत्तर देताना केला.

राज्य सरकारने मराठा समाजाच्या आरक्षणसाठी हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला असून, त्यासंदर्भातील जीआर देखील काढला आहे. या जीआरमुळे कुणबी नोंदी असणाऱ्या मराठा समाजातील लोकांना कुणबी प्रमाणपत्र भेटणार असून, ओबीसीतून आरक्षणाचा लाभ भेटणार आहे. या जीआरविरोधात ओबीसी संघटना आक्रमक झाल्या असून, यामुळे ओबीसींचे आरक्षण धोक्यात आल्याचे त्यांचे म्हणणे आहे. हैदराबाद गॅझेटमुळे ओबीसी आरक्षणाला धोका निर्माण होणार असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. त्या आरोपांना उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपरोक्त पुनरुच्चार केला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "2014 ते 2025 या काळात ओबीसी समाजासाठी जितके निर्णय झाले, ते केवळ आमच्या सरकारकडूनच झाले आहेत. ओबीसी वेगळे मंत्रालय आणणारे आम्ही, ओबीसींसाठी योजना आखणारे आम्ही, 'महाज्योती' स्थापन करणारे आम्हीच. ओबीसींसाठी 42 नवीन वसतिगृहे देणारे आणि उद्धव ठाकरे सरकारने घालवलेले 27 टक्के राजकीय आरक्षण परत आणणारे आमचे सरकार आहे. मग ओबीसींचे खरे हित पाहणारे कोण, हे समाजाला उत्तम ठाऊक आहे."

यापूर्वीच्या कोणत्या सरकारने ओबीसींचे हित केले? अशी विचारणाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ओबीसी हिताच्या संदर्भात आम्ही केलेले काम आणि इतर सरकारांनी केले काम, यावर माझ्याशी खुली चर्चा करावी, असे आव्हान देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना दिले. ते म्हणाले, विरोधकांना केवळ राजकारण करता येते. पण आम्हाला ओबीसी समाजाचे हित पाहायचे आहे, आणि आम्ही ते करणारच आहोत. सगळ्या समाजांचे हित आमचेच सरकार करू शकते, असा दावाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

ओबीसी समाजातील दोन तरुणांनी आरक्षणाच्या मुद्द्यावरून आत्महत्या केली आहे. यावही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, जो पर्यत दोन्ही समाजाचे नेते खरी वास्तविकता समाजापर्यंत पोहोचवणार नाहीत, तोपर्यंत हे तेढ कमी होणार नाही. ज्यांच्याकडे कुणबी नोंदी आहेत, त्यांनाच प्रमाणपत्र मिळणार आहे. विना नोंदीचे कुणालाही प्रमाणपत्र मिळणार नाहीत. त्यामुळे ओबीसी समाजाने चिंता करण्याची आवश्यकता नाहीये, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

कुठेतरी आरक्षण गेलेल्याचे वातावरण तयार केले जात आहे. अशा प्रकारचे वातावरण तयार केल्यामुळे मुलांच्या मानसिकतेवर त्याचा परिणाम होतो. दुसरीकडेही, टोकाचेच राजकारण चाललेले आहे. अशा राजकारणाने कधीच समाजाचे भले होऊ शकत नाही. समाजापर्यंत वास्तविकता पोहोचवली तरच समाजाचे भले होऊ शकते. आम्ही ती वास्तविकता समाजापर्यंत पोहोचवत आहोत. समाजाची काळजी आम्ही घेत आहोत. त्यामुळे नेत्यांनी कितीही राजकारण केले, तरी समाज वास्तविकता समजून घेतो, हा माझा आजपर्यंतचा अनुभव आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

राज्याची एकतेची वीण उसवली जात असल्याचे शरद पवार म्हणाले होते. वाट्टेल ते प्रयत्न करून आम्ही ते होऊ देणार नाही, असेही त्यांनी म्हटले आहे. यावरही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवी यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, शरद पवार साहेब कशासाठी प्रसिद्ध आहेत, हे आपल्याला माहीत आहे. पवार साहेबांनी एक्स म्हटले की, वाय समजायचे. ते मोठे नेते असल्यामुळे त्यांच्यावर आणखी काय बोलणार.

## भारत-पाकिस्तान सामन्यावरून वादंग

**मुंबई** : दुबई येथे आज आशिया कप स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हायव्होल्टेज सामना होणार आहे. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर दोन्ही देशांतील हा पहिलाच आंतरराष्ट्रीय सामना असल्याने देशभरातील क्रिकेट चाहत्यांमध्ये संमिश्र भावना आहेत. शिवसेना ठाकरे गटाकडून या सामन्याला विरोध दर्शवण्यात आला असून, 'माझं कुंकू, माझा देश' या घोषवाक्याखाली राज्यभरात महिला आघाडीने केंद्र सरकारचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे.

पहलगाम हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबीयांनीही या सामन्यावर तीव्र आक्षेप घेतला आहे. "ज्यांच्या हातांना आमच्या लोकांचे रक्त लागले आहे, त्यांच्याशीच आमचा सामना होत आहे," अशा संतप्त प्रतिक्रिया त्यांनी दिल्या आहेत. त्यामुळे या सामन्याभोवती राजकीय आणि भावनिक वादंग निर्माण झाला आहे.

भारत-पाकिस्तान सामन्याला विरोध दर्शवण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला. या सामन्याच्या निषेधार्थ राज्यव्यापी आंदोलन केले जात आहे. अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांनी टीव्ही संच फोडून आपला निषेध व्यक्त केला.

मुंबईत शिवसेना ठाकरे गटाने या क्रिकेट सामन्याविरोधात निदर्शने केली. यावेळी पक्षाच्या महिला पदाधिकारी हातात सिंदूर घेऊन पोहोचल्या. या निषेधादरम्यान बीसीसीआयसाठी देणग्याही गोळा करण्यात आल्या. 'ज्यांच्या हातात रक्ताचे डाग आहेत, त्यांच्यासोबत सामना का?' असा सवाल उपस्थित केला. बीसीसीआयला निधीची गरज असल्यास आम्ही चंदा देऊ, पण हा सामना खेळू नका, अशी मागणीही त्यांनी केली.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले संतोष जगदाळे यांची मुलगी असावरी जगदाळे यांनी भारत-पाकिस्तान सामन्यावर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. त्या म्हणाल्या, "मला असे वाटते की आजचा सामना व्हायला नको होता. अजूनही वेळ आहे. पण मला नाही वाटत की बीसीसीआय असा विचार करेल. ही खूप लाजिरवाणी गोष्ट आहे. पहलगामच्या घटनेला अजून सहा महिनेही झाले नाहीत आणि त्यानंतर 'ऑपरेशन सिंदूर' झाले. इतकं सगळं घडल्यानंतरही त्यांना हा सामना आयोजित करण्याची लाज वाटत नाही, याचं मला खूप वाईट वाटतं. मला वाटतं की लोकांना जीव गमवावा लागला, याची या लोकांना पर्वा नाही."

## ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण हवे : जितेंद्र आव्हाड

**नाशिक** : ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा आरक्षण मिळावे, ही आमच्या नेत्यांची भूमिका आहे. हैदराबाद गॅझेट लागू झाल्यानंतर सहा महिन्यांनी लोकांना कळेल की काय मिळालं? मराठा ओबीसी वाद पेटवण्याचा प्रयत्न करण्यात आला. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू नये , ही भूमिका आम्ही व्यासपीठावरून जाहीर करतो, असे शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.

आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले की,ओबीसी विरुद्ध मराठा हा अतिशय संवेदनशील मुद्दा आहे. दोन्ही समाजांना अस्वस्थ करण्यात यश आले आहे. काल छगन भुजबळ साहेबांबाबत बोलले गेले की, त्यांच्या पोटात, गळ्यात लाथ मारा आणि मंत्रिमंडळातून हाकलून द्या. अशा ज्येष्ठ नेत्याचा आणि मंत्र्याचा अपमान राज्याच्या राजकीय संस्कृतीला शोभणारा नाही.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ महाराष्ट्रात स्थापन झाला आहे, तर गांधीची हत्या करणाराही महाराष्ट्रातच जन्माला आला आहे. हैदराबाद गॅझेटवर अनुसूचित जमातीचे (ST) अधिकारी नाहीत. हे गॅझेट लागू झाल्यानंतर सहा महिन्यांनी लोकांना कळेल की, त्यांना काय मिळाले आहे. भुजबळ ओबीसी समाजाचे नेते आहेत. सरकारमधील नेतेच जर बोलत नसतील, तर ओबीसी समाजाची काय अवस्था असेल?.आज जमीनदार मराठा अल्पभूधारक झाला आहे. आरक्षण कोणा एकासाठी येत नाही. मराठा समाजासाठी आम्ही सोबत राहू.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, इतरांनाही आरक्षण द्या, आम्ही तुमच्यासोबत लोकसभेत उभे राहू. मराठा आरक्षणाचा प्रश्न लोकसभेत आणल्यास त्यांचे खासदार मराठा समाजाला पाठिंबा देतील. मराठा आणि ओबीसींमध्ये वाद लावण्यात सरकार यशस्वी झाले आहे,असे ते म्हणाले. हा वाद पेटवण्याचे काम सुरू असून, याचे मूळ राजकारणात असल्याचेही त्यांनी सांगितले. आपल्या भाषणात आव्हाड यांनी शरद पवार आणि गोपीनाथ मुंडे यांच्यातील राजकीय संस्कृतीचे उदाहरण दिले. गोपीनाथ मुंडे यांनी पवार साहेबांवर टीका केली असताना, वातावरण तापले होते. त्यावेळी पवार साहेबांनी रात्री अडीच वाजता पोलिसांची बैठक घेऊन मुंडेंची सुरक्षा व्यवस्था तीनपट वाढवण्याचा आदेश दिला होता, अशी आठवण त्यांनी करून दिली.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ सप्टेंबर २०२५


## जय भवानी महाविद्यालयाचा "पंजाब पूरग्रस्तांना" आर्थिक मदतीचा हात



**पाटोदा (प्रतिनिध ) :** पाटोदा येथिल जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान महाविद्यालय,हे नेहणीच सामाजिक जाणिवेतून विविध समाज विधायक उपक्रम राबवित असते.

नुकतेच पजांब मध्ये अतिवृष्टी मुळे महापुरामुळे अतोनात नुकसान झाले आहे.तेथिल पूरग्रस्थाना महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी मदत फेरी काढुन जमलेला निधी मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम व प्र.प्राचार्य सोमनाथ घाडगे यांच्या शुभ हस्ते सामाजिक कार्यकर्ते श्री.कंकरसिंग टाक यांच्या कडे मदत निधीची रक्कम सुपूर्द केली.

या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. महाविद्यालयाने अतापर्यंत देशात जेव्हा जेव्हानैसर्गिक अपत्ती आली तेथे मदत केलेली आहे. महाविद्यालय सतत सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम हाती घेते.






## मनपा शाळेची उत्तुंग भरारी ! विभागीय स्तरीय कॅरम स्पर्धेसाठी पात्र ठरले !



**छत्रपती संभाजीनगर :** येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय कॅरम स्पर्धेत मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर या शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळ सादर केला.

मयुरी नाथ भजन तेजस मगरे या दोन विद्यार्थ्यांची विभाग स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे .

या यशामागे मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी सर, क्रीडा प्रशिक्षक इरफान सय्यद, सहशिक्षक दीपक सर, सचिन गायकवाड सर, निकम मॅडम आणि संपूर्ण शिक्षक वृंद याचे मार्गदर्शन व सहकार्य मोलाचे ठरले.विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, चिकाटी आणि संघ भावनेने खेळ करत हा मानाचा टप्पा गाठला.

## गुंजोटीच्या श्रीकृष्ण महाविद्यालयात तेवीस सप्टेंबरला नवोपक्रम व संशोधन स्पर्धा २०२५ चा आविष्कार

**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात दिनांक 23 सप्टेंबर 2025 वार मंगळवार रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

त्यासंदर्भातील जवळपास संपूर्ण तयारी झाली असून आतापर्यंत विविध महाविद्यालयातील स्पर्धकांनी 150 च्या वर नावनोंदणी केली असून ,नावनोंदणीची मुदत आणखी अठरा तारेखेपर्यंत वाढविण्यात आली असल्याची माहिती स्पर्धा आयोजनाच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी संदर्भात घेतलेल्या बैठकीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गुलाब राठोड ,जिल्हा समन्वयक डॉ.रामकृष्ण कदम आणि महाविद्यालय समन्वयक डॉ.एम.जी.आंबुसे यांनी संयुक्तरीत्या घेतलेल्या पत्रकारपरिषदेत दिली आहे.

आविष्कार स्पर्धेतून संशोधन संस्कृतीला चालना मिळावीविद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण कल्पना व संशोधन वृत्ती वाढीस लागून ती विकसित करण्यासाठी,विद्यार्थ्यांच्या संशोधन व जीज्ञसा वृतीला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासन राजभवनाच्या वतीने 2006 पासून "आविष्कार" संशोधन प्रकल्प स्पर्धा सुरू केली आहे.

राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठांच्या शैक्षणिक आयुष्यात ही स्पर्धा महत्त्वाचा टप्पा व उपक्रम ठरणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने गेल्या काही वर्षांपासून संलग्न महाविद्यालये व संस्थांतील विद्यार्थी व शिक्षकांना सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहन दिले आहे.

आविष्कार स्पर्धेची नाविन्यपूर्ण व जय्यत तयारी करण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.त्या त्या समितीतील सर्व सदस्यांनी आपआपली जबाबदारी चोखपणे पार पाडण्याचे आदेश देण्यात आले असून पुनर्गठित केलेल्या समितीला शिस्तीचे सर्व संकेत पाळण्याची प्रतिज्ञा देण्यात आली.जिल्ह्यातून निवड झालेल्या महाविद्यालयापैकी गंगापूर येथील मुक्तानंद महाविद्यालयात 10 सप्टेंबर रोजी तर ,13 सप्टेंबर रोजी जालना जिल्ह्यातून परतूर येथील लालबहादुर शास्त्री महाविद्यालयात पार पडलेल्या नावोपक्रम व संशोधन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी समाधानकारक सहभाग नोंदवला.

18 सप्टेंबर रोजी बीड जिल्ह्यातून बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात ही स्पर्धा होणार असून येत्या 23 सप्टेंबरला धाराशिव जिल्ह्यातून श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी यांना यावर्षीचा पहिल्यांदाच यजमानपदाचा बहुमान मिळाला आहे.

त्यामुळे महाविद्यालयाची जय्यत तयारी चालू असून, विद्यार्थ्यांच्या नवनवोन्मेष प्रतिभाना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी वेगवेगळ्या संकल्पना राबविण्याच्या सूचना यावेळी प्राचार्यांनी दिल्या.चार जिल्ह्यातील सहा शाखेतील विजेते स्पर्धक केंद्रीय आविष्कार स्पर्धेत सहभागी होतील.

प्रत्येक जिल्ह्यातून निवडण्यात आलेले टॉप थ्री संघ हे केंद्रीय आविष्कार स्पर्धेत सहभागी होणार आहेत.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरात येत्या 3 आणि 4 ऑक्टोबर रोजी ही स्पर्धा होणार असून जिल्हास्तरावर केवळ पदवीचा आविष्कार होईल.या स्पर्धेत नवोन्मेष, तंत्रज्ञान, समाजोपयोगी शोध व पर्यावरण संवर्धन यांसारख्या विषयांवर प्रकल्प सादर होणार आहेत.

अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पांना स्टार्टअप व उद्योजकतेच्या दिशेने नेले आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरते. "विद्यार्थ्यांमध्ये संशोधन संस्कृती रुजविणे हे आजच्या ज्ञानाधारित समाजाचे महत्त्वाचे लक्ष्य असून, आविष्कार स्पर्धा हा त्या दिशेने टाकलेले एक भक्कम पाऊल आहे," हे लक्षात घेऊन सर्वांनी कामाला लागावे अशा सूचनाही महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांनी दिल्या.

या स्पर्धेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संलग्नित पदवी पर्यंतचे विद्यार्थी सहभाग नोंदवू शकतात तरी या आविष्कार स्पर्धेकरिता जिल्ह्यातील जास्तीतजास्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गुलाब राठोड व संयोजन समितीचे समन्वयक डॉ एम. जी. अंबुसे, जिल्हा समन्वयक डॉ. राम कदम आदींनी केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ सप्टेंबर २०२५


# दौलताबाद घाट जाम





**दौलताबाद (जावेद अहेमद)** : रविवारी दि १४ रोजी दुपारी दौलताबाद खुलताबाद रस्त्यावर असलेल्या दिल्ली दरवाजा येथे एक वाहन एक वेळी जाते पण काही वाहनचालक न जुमानता आपली वाहने येथे घुसवल्या ने नेहमीच ट्राफिक जाम होऊन जातेआज रविवार असल्याने पर्यटनासाठी आलेले पर्यटक व खुलताबाद येथे सुरु असलेल्या उरूस साठी शहरातील तसेच जिल्ह्यातील व परजिल्हा तील मोठ्या प्रमाणावर दर्शनासाठी येतात आज रविवार असल्याने सकाळ पासून उरूस साठी वाहनांच्या रांगच रांग लागल्या होत्या दुपारी अचानक पाऊस आल्याने अनेक दुचाकी स्वार रस्त्यावर झाडाखाली व हॉटेल पेट्रोल पंप येथे थांबले होते नंतर पाऊण कमी झाल्याने सर्व वाहने एकच वेळी रस्त्यावर आल्याने दिल्ली दरवाजा पासून दौलताबाद गावातील देवगिरी शाळे पर्यत वाहनाची रांग लागली होती तर वर घाट वर तीन ते चार किलोमीटर पर्यंत वाहतूक विस्कळीत झाली होतीछावणी वाहतूक शाखा व दौलताबाद पोलिसांनी प्रयत्न करत वाहतूक सुरळीत केलीदौलताबाद टी पॉइंट येथून वाहतूक कसाबखेडा मार्गे वळवण्यात आली होतीयावेळी पोलीस उपनिरीक्षक वसंत शेळके, सहायक पोलीस उपनिरीक्षक सोमीनाथ जाधव,महेश घुगे, विजय वानखेडे, अनिल भालेराव, अंतील पवार,लक्ष्मण गोरे,मनोज राठोड,जयलाल राठोड यांनी वाहतूक सुरळीत केली


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


# किनगाव राजा येथील सौर ऊर्जा प्रकल्प स्थलांतराचा प्रश्न ऐरणीवर



**बुलढाणा** (महेश मुंढे ) : याबाबत सविस्तर वृत्त असे की सिंदखेड राजा तालुक्यातील किनगाव राजा येथील फुलेनगर येथील शासकीय गट क्रमांक 525 मध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प अंतर्गत हा प्रकल्प सुरू होणार आहे परंतु काही नागरिकांनी याला आक्षेप दर्शविला आहे नागरिकांचे म्हणणे आहे की मानवी वस्ती जवळ हा प्रकल्प असल्यामुळे मानवी आरोग्य व पर्यावरणावर याचा परिणाम होऊ शकतो, नागरिकांच्या मते प्रकल्पासाठी बसवण्यात येणारे सौर पॅनल हे परिसरातील तापमान वाढवतात, त्यामुळे याचा परिणाम मानवी आरोग्यावर होऊ शकतो व त्यातून प्रदूषण वाढण्याची भीती देखील आहे. परंतु तज्ञांच्या मते सौर ऊर्जा निर्मिती ही हवामान बदलाच्या समस्येवर मोठा उपाय आहे, सौर ऊर्जा ही आजच्या काळाची गरज आहे हे निर्विवाद सत्य आहे.

विजेच्या वाढत्या मागणी पुढे आणि हवामानाच्या बदलत्या भीषण आव्हान पुढे ऊर्जा निर्मितीचे पर्याय शोधणे अपरिहार्य आहे आणि सौर ऊर्जा हा त्यातील सर्वात शाश्वत पर्याय मानला जातो. आणि तसे पाहता आपण जर पाहिले तर मानवी वस्तीमध्ये, मोठमोठ्या इस्पितळांवर, धार्मिक स्थळांवर, व्यावसायिक स्थळांवर मोठ्या प्रमाणात सौर ऊर्जेचा वापर केला जात आहे त्यातील प्रत्येक जण आपली स्वतःची वीज निर्मिती करून निरोगी व आनंदी आहेत त्यांचा कुठलाही आक्षेप नाही. राहिला प्रश्न मानवी आरोग्यास धोका असल्याचा तर आपल्या गावात असलेले मोबाईल टावर हे सौर ऊर्जा पेक्षा जास्त घातक आहेत तरीदेखील आपण त्यांच्या सानिध्यात राहतोच, त्यातून निघणारे रेडिएशन हे मानवी आरोग्यास किती घातक आहे हे वैज्ञानिक दृष्ट्या सिद्धही झाले आहे. आजच्या काळात ऊर्जा ही प्रत्येक देशाची गाव खेड्यांच्या विकासाची कणा मानली जाते.

दगडी कोळशाच्या इंधनावर चा वाढता ताण त्यातून निर्माण होणारे भयावह प्रदूषण व हवामान बदल यामुळे पर्यायांचा शोध घेणे अपरिहार्य झाले आहे, या पार्श्वभूमीवर सौर ऊर्जा हा एक महत्त्वाचा शाश्वत पर्याय ठरत आहे,सूर्याच्या अक्षय ऊर्जेचा वापर करून वीज निर्मिती करणे म्हणजे प्रदूषण मुक्त वीज वापरणे हेच होऊ शकते. सरकार व स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायत यांची जबाबदारी फक्त प्रकल्प उभारण्यापूर्तीच मर्यादित नसून त्यांनी देखील स्थानिक पातळीवर जनजागृती करणे हे देखील महत्त्वाचे आहे.किनगाव राजा येथील शासकीय गट क्रमांक 525 मध्ये सामाजिक वनीकरण विभागाने शेकडो झाडे लावली व ग्रामपंचायतीने त्याचे योग्य संगोपन देखील केले परंतु वनीकरणातील ही झाडे देखील पर्यावरणास कितपत योग्य आहेत याचा देखील या विचार करायला हवा, गिरीपुष्प नावाची ही झाडे विषारी असल्याचा दावा पर्यावरण प्रेमींनी या आधीच केला आहे, सरपटणारे प्राणी जसे पाली, उंदीर, साप,सरडे व एवढेच नाही तर वन्यजीव व पक्षी देखील या झाडांच्या सानिध्यात राहत नाहीत, या झाडांच्या फुलांचा गंध इतका उग्र असतो की आपला शेतकरी वर्ग पिकांमध्ये उंदरांचा प्रभाव वाढू नये म्हणून ह्या झाडाची फुले शेतामध्ये ठिकठिकाणी टाकतात.

तर मग अशा ठिकाणी पर्यावरण पूरक प्रकल्प उभा राहत असेल तर हा प्रकल्प स्थलांतरित करण्याची मागणी कितपत योग्य आहे! पर्यावरण प्रेमींचे म्हणणे आहे की सोलार पॅनल साठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड व मोकळ्या जागेचा वापर होत असल्याने स्थानिक जैवविविधतेवर याचा परिणाम होऊ शकतो, तर दुसरीकडे प्रशासनाचे म्हणणे आहे की हा प्रकल्प शासकीय नियम व पर्यावरणीय मानदंड पाडूनच मंजूर करण्यात आला आहे.

"श्री प्रकाश मुंढे सरपंच ग्रामपंचायत किनगाव राजा यांच्यासोबत चर्चा केली असता त्यांनी सांगितले की या प्रकल्पासंदर्भात नागरिकांचे प्रश्न अधोरेखित करत प्रशासनासमोर मांडले आहेत व लवकरच हा प्रकल्प नागरिकांच्या पाठिंब्याने गावाच्या विकासासाठी उभा करू व हा प्रकल्प शासकीय व पर्यावरणीय मानदंड पळूनच मंजूर करण्यात आला आहे, भविष्यात गावाच्या विकासाला गतीही मिळेल आणि नवनवीन शासकीय योजना व प्रकल्प यांचा फायदा ही मिळेल व शासकीय जमिनीवरचे होणारे अतिक्रमण देखील रोखता येईल." सौर ऊर्जा ही काळाची गरज आहेच पण नागरिकांची मागणी ही देखील हट्टीपणा नसून विकासाला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न समजून प्रशासनाने व ग्रामपंचायत किनगाव राजा यांनी नागरिकांमध्ये जनजागृती करणे ही गरजेचे आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ सप्टेंबर २०२५


# ज्ञानेश्वर विद्यालय बेगमपुरा येथे 'हिंदी दिन' उत्साहात साजरा

**बेगमपुरा :** विवेकानंद शिक्षण संस्था संचलित ज्ञानेश्वर विद्यालय, बेगमपुरा येथे आज 'राष्ट्रीय हिंदी दिवस' उत्साहपूर्ण व गौरवशाली वातावरणात साजरा करण्यात आला.

हा कार्यक्रम विद्यालयाच्या कै. पंढरीनाथ पाटील उर्फ भाऊ ढाकेफळकर सभागृहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे मॅडम होत्या.

यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. तांगडे सर, ज्येष्ठ शिक्षिका सौ. मंगला पवार मॅडम, तसेच ज्येष्ठ शिक्षक श्री. कोठुळे सर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक स्व. पंढरीनाथ पाटील शिसोदे (भाऊ) यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. नाझेरा पठाण मॅडम यांनी केले.

या प्रसंगी डॉ. रवींद्र साठे यांनी प्रस्ताविक भाषण करताना हिंदी भाषेचे महत्त्व, साहित्यिक व सांस्कृतिक योगदान यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे परीक्षण श्री. भरत झोडपे व राजकुमार देगलूरकर यांनी केले.विद्यार्थ्यांनी कविता वाचन, नाटक, नृत्य, कव्वाली व संगीत गायन यांसारख्या विविध सांस्कृतिक स्पर्धांत उत्साहाने सहभाग घेतला.

या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व भाषाप्रेमाला चालना मिळाली.समारोपाचे भाषण सौ. मंगला पवार मॅडम यांनी केले, तर आभारप्रदर्शन सौ. झिरपे मॅडम यांनी केले.

ज्ञानेश्वर विद्यालय परिवार आयोजित हा उपक्रम हिंदी भाषेच्या गौरवाचा सोहळा ठरला तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी व्यासपीठही ठरला.






# निरगुडी बु. ठाकरवाडी या भागात बाजरी सोंगणीला वेग



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** खुलताबाद तालुक्यातील निरगुडी बुद्रुक ठाकरवाडी या भागात १४ सप्टेंबर २०२५ रोजी पासून बाजरीची सोंगणी (सवंगणी) ला जोरात सुरूवात केली आहे बाजरी हे पीक अधिक सहनशील आणि धान्याबरोबरच चारा देणारे पीक आहे.

पाऊस उशिरा, अनिश्चित व कमी प्रमाणात झाला तरी इतर तृणधान्यापेक्षा अधिक धान्य व चारा उत्पादन देणारे हे पीक आहे आपत्कालीन पीक व्यवस्थापनामध्ये महत्त्वाच्या असलेल्या पिकाची खरिपात लागवड करताना योग्य ती काळजी घेतल्यास चांगले उत्पादन मिळवणे शक्य होते आपत्कालीन पीक व्यवस्थापनामध्ये या पिकाला महत्त्व आहे.

कमी कालावधीत तयार होणारे तृणधान्य पीक असल्यामुळे खरिपानंतर रब्बीची पिके वेळेवर घेता येतात. ठाकरवाडी निरगुडी बु मधील बाजरी,मक्का,कापूस आणी तुर ही मुख्य पिके घेतली जातात आदिवासी ठाकर बांधव हे बाजरी पीक मोठ्या प्रमाणात घेतात हे पीक आपल्या कुटुंबातील उदरनिर्वाह करण्यासाठीच घेतले जाते विक्रीसाठी पीक घेतले जात नाही असे दिसून आले.

या ठाकरवाडीतील आदिवासी ठाकर बांधव बाजरी ची भाकरी दररोज खातात पावसाने जास्त जोर धरल्यामुळे बाज-या वरच्यावर उगू लागल्या आहेत दोन दिवसापासून पावसाणे सुटका दिल्यामुळे शेतकरी बाजरी सोंगणी मध्ये व्यस्त आहेत व कामे जोरात सुरू केली आहेत.

दरवर्षी नवरात्री मध्ये जोरात पाऊस येत असतो आणी बाजरी,टोमॅटो मक्का व ईतर पिकांची मोठ्या प्रमाणात नुकसान होत असते असे शेतक-यांनी सांगितले आज ढगाळ वातावरण असल्यामुळे काहींनी वरच्यावर कणसं (लाणी) कापूण घेत आहेत राजू डोके,केरुबा डोके, एकनाथ आगिवले रामभाऊ गावंडे,भाऊसाहेब गावंडे आदि आदिवासी ठाकर बांधवांनी बाजरी ची सोंगणी करून आणी खराब ओली न होता तिचे कोरड्या ठिकाणी व्यवस्थापन लवकरात लवकर कसे होईल याकडे सर्वांनी जोर धरला आहे असे शेतक-यांनी सांगितले.

# गढी महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेचा समारोप



**गढी :** कबड्डी भारतीय संस्कृतीचा महत्त्वाचा खेळ -श्री. प्रमोद गोरकर, जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर व कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ व ९ सप्टेंबर २०२५ रोजी आंतरमहाविद्यालयीन कबड्डी (पुरुष) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेच्या समारोप व बक्षीस वितरण समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासन अधिकारी श्री प्रमोद गोरकर, सहप्रशासन अधिकारी श्री काशिनाथ गोगुले व लेखापाल श्री प्रतापराव हातोटे, तसेच प्र. प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम हे उपस्थित होते. या कार्यक्रमात सर्व मान्यवरांच्या हस्ते या आंतर महाविद्यालयीन कबड्डी(पुरुष) स्पर्धेमध्ये विजेत्या ठरलेल्या ऍड. बी..डी.हंबर्डे महाविद्यालय आष्टी व उपविजेता ठरलेला आर. बी. अट्टल महाविद्यालय गेवराई या दोन्ही संघाना बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना श्री. प्रमोद गोरकर यांनी असे प्रतिपादन केले की कबड्डी हा एक लोकप्रिय भारतीय खेळ असून, तो शारीरिक तंदुरुस्ती, सहनशक्ती आणि चपळता वाढवतो, तसेच सांघिक भावना, जलद निर्णयक्षमता आणि धैर्याला प्रोत्साहन देतो. हा खेळ भारतीय संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग असून, तो सामाजिक कौशल्ये सुधारतो आणि तरुण पिढीला त्यांच्या मुळांशी जोडतो. यावेळी त्यांनी स्पर्धेत सहभागी होऊन आपली भारतीय संस्कृती दृढ करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्व कबड्डी खेळाडूंचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे दुसरे प्रमुख अतिथी श्री. काशिनाथ गोगुले यांनी बोलताना असे प्रतिपादन केले की या आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सर्वच खेळाडूंनी या स्पर्धेदरम्यान चपळता, समय सूचकता,एकाग्रता, सांघिक भावना,विविध बचाव तंत्रांचा वापर करून अनोख्या खेळाचे प्रदर्शन केले. हे सर्व कबड्डी खेळाच्या विकासासाठी व प्रसारासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. लेखापाल श्री. प्रतापराव हातोटे यांनी आपल्या मनोगतातून सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील खेळासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच पुढे बोलताना ते असे म्हणाले की विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ अत्यंत आवश्यक आहेत. त्यामुळे तुम्हाला उपलब्ध झालेल्या संधीचा पुरेपूर उपयोग करून आपल्यातील क्षमतांचा वापर या स्पर्धे दरम्यान केला आहे हे निदर्शनास आले आहे.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांनी असे प्रतिपादन केले की जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून या आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन उत्कृष्ट कामगिरी केलेल्या सर्व खेळाडूंचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. खरोखरच आपण या स्पर्धेदरम्यान ज्याप्रकारे खेळाचे प्रदर्शन केले ते डोळ्याचे पारणे फेडणारे होते. अशाच प्रकारे आपण उत्तरोत्तर प्रगती करून आपले भविष्य उज्वल करावे. यावेळी त्यांनी विजेत्या संघासह सर्वच खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपातून असे प्रतिपादन केले की कबड्डी स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सर्वच संघाची कामगिरी उत्तम होती. हार जीत हा आपल्या मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. त्यामुळे जे संघ काही कारणास्तव विजेते होऊ शकले नाहीत त्यांनी निराशा न बाळगता नव्या उमेदीने पुढील स्पर्धेस सामोरे जावे.

तुम्हा सर्व खेळाडूंनी आपल्या खेळातून खिलाडूवृत्तीचे प्रदर्शन केलेले आहे. कोणत्याही प्रकारची आक्रमकता न दाखवता अत्यंत शांत व संयमाने आपण ही क्रीडा स्पर्धा पार पाडलेली आहे त्यामुळे सर्व खेळाडूंचे मनस्वी अभिनंदन करणे अनिवार्य आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. बाळासाहेब सरपते तर आभारप्रदर्शन विद्यार्थी विकास विभाग प्रमुख प्रा डॉ. राणी जाधव यांनी केले.या आंतरमहाविद्यालयीन कबड्डी (पुरुष ) स्पर्धेसाठी बीड जिल्ह्यातून दहा संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेसाठी पंच म्हणून डॉ.बाळासाहेब धोंडे, डॉ खोसे,डॉ.रमेश माने, डॉ.भीमा माने, डॉ. प्रवीण शिलेदार,डॉ. भारत पल्लेवाड डॉ. केतन गायकवाड,डॉ. रवी खरात यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी व क्रीडा प्रेमी बहुसंख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ सप्टेंबर २०२५


## जेईएस महाविद्यालय जालना येथे अंतर महाविद्यालय धनुर्विद्या स्पर्धा संपन्न



जालना (**प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे**) : धनुर्विद्या हा भारतीय खेळ असून, युवकांनी हा खेळून देशाचे नाव उज्वल करावे, असे प्रतिपादन अंतर महाविद्यालयीन धनुर्विद्या सामन्यांच्या उद्घाटन प्रसंगी जालना सायबर सेलचे पोलीस उपनिरीक्षक श्री योगेश चव्हाण यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर व जेईएस महाविद्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने अंतर महाविद्यालयीन धनुर्विद्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते यावेळी स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जालना सायबर सेलचे पोलीस उपनिरीक्षक श्री योगेश चव्हाण होते तर कार्यक्रमाचे अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री होते.

व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे क्रीडा संचालक श्री सचिन देशमुख होते, के एस के महाविद्यालय बीडचे क्रीडा संचालक डॉ.प्रदीप सानप, क्रीडा संचालक डॉ. वाकडे, जेईएस महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. हेमंत वर्मा,राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ. राजेंद्र सोनवणे आदींची उपस्थिती होती.

यावेळी क्राफ्ट कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा संचालक डॉक्टर हेमंत वर्मा यांनी केले गेल्या पंधरा वर्षापासून अंतर महाविद्यालयीन धनुर्विद्या स्पर्धेच जेइएस महाविद्यालय आयोजन करत असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना पोलीस उपनिरीक्षक श्री योगेश चव्हाण म्हणाले की युवकांनी धनुर्विद्या या खेळाकडे वळावे हा भारतीय खेळाडूनी जवळपास जगात 37 देशांमध्ये खेळला जातो हा खेळ खेळून भारतीय परंपरेचे नाव उज्वल करावे.

महाभारत रामायण काळापासून हा खेळ खेळला जातो. यामधूनही युवकांचे करिअर होऊ शकते असेही श्री चव्हाण यांनी सांगितले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे छत्रपती संभाजीनगर येथील क्रीडा संचालक श्री सचिन देशमुख यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की, युवकांनी विविध खेळ खेळून आपले करिअर करावे.

राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक कमवा असे डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.यावेळी विजयी स्पर्धकांना मेडल व प्रशस्ती पत्र देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी धनुर्विद्या खेळाचे मार्गदर्शक विक्रम लाहोट,क्रीडा विभागाचे प्रा. राहुल सारस्वत, डॉ. किशोर बिरकायलू पंच सचिन तेकुर श्री भुरेवाल. आदींची उपस्थिती होती.

## दौलताबाद रविवारचा बाजार गेले वाहून





**दौलताबाद (जावेद अहेमद)** : दौलताबाद रविवार चा बाजार गेले वाहूनदौलताबाद येथे दि 14 रविवारी दुपारी अचानक आलेल्या जोरदार पावसाने आल्याने बाजार वाहून गेले यात अनेक दुकानात पाणी शिरल्याने भाजीपाला व अन्य जीवनावश्यक वस्तूंच्या दुकानदारांना याचा फटका बसून नुकसान झाले आहे.

अचानक जोरदार पाऊस आल्याने दुकानदारांची तारांबळ उडाली पाणी दुकानात शिरले यात महिला व दुकानदार हतबल झाले पाहता पाहता सामानाची आवराआवर करत हतबल झाले यात भाजीपाला व जीवनावश्यक वस्तू वाहून गेले.

दौलताबाद रविवार चा बाजार केसापुरी रस्त्यावर भरतो परिसरातील मोठे बाजार म्हणून ओळखले जाते याला जवळपास पंधरा ते वीस गावातील लोका बरोबर जवळील वसाहतीतील लोक या बाजारात खरेदी करण्यासाठी येत असतातलाखों रुपयांची उलाढाल होऊन खरेदी विक्री होतेकिल्याच्या रासाई माताच्या डोंगरावरील पावसाचे पाणी या मार्गाने येथे येतं असल्याने हे हे नुकसान झाले आहे.

दौलताबाद ग्रामपंचायत ने रविवार बाजारासाठी दहा वर्षापूवी खुलताबाद रस्त्यावर दिल्ली दरवाजा जवळ बाजार शेट बांधून ओटे तयार करून बनवले आहेपण आता पर्यंत बाजार तिथं गेलेले नाही


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A. (मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ सप्टेंबर २०२५

# लोकशाहीचा जागर : आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाचे बहुआयामी महत्त्व

मानवजातीच्या इतिहासातील सर्वात मोठी देणगी म्हणजे लोकशाही होय. जगात आज विविध प्रकारच्या शासनपद्धती अस्तित्वात असल्या तरी लोकशाही हीच एक अशी व्यवस्था आहे जिच्यात प्रत्येक माणसाचे स्थान महत्त्वाचे आहे. सत्ता एका व्यक्तीकडे किंवा गटाकडे केंद्रीत न राहता ती संपूर्ण समाजाच्या, नागरिकांच्या हाती असावी ही लोकशाहीची मूलभूत संकल्पना आहे. त्यामुळे लोकशाही म्हणजे केवळ मतदानाची प्रक्रिया किंवा निवडणुका नव्हेत तर लोकशाही म्हणजे नागरिकांचा सहभाग, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, समानतेची हमी, न्यायाचा अनुभव आणि परस्पर बंधुभावाची जीवनपद्धती होय. लोकशाही म्हणजे केवळ शासनपद्धती नाही, तर ती जीवन जगण्याची एक संस्कृती आहे. समानता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, सहभाग आणि जबाबदारी या लोकशाहीच्या मूल्यांवरच खऱ्या अर्थाने मानवी समाजाचा विकास होऊ शकतो. म्हणूनच 15 सप्टेंबर हा दिवस संयुक्त राष्ट्र संघाने ‘आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन’ म्हणून घोषित केला आहे. आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा दिवस म्हणजे जगभरातील देशांना लोकशाही जपण्याची, बळकट करण्याची जाणीव करून देण्यासाठी लोकशाहीच्या मूल्यांचे स्मरण, तिच्या रक्षणाची शपथ आणि नागरिकांच्या सजगतेची आठवण करून देणारा एक जागतिक सोहळा आहे.

लोकशाही ही संकल्पना अत्यंत प्राचीन असून लोकशाहीची मुळे इतिहासात खोलवर रुजलेली आहेत. प्राचीन ग्रीक सभ्यतेत ‘डेमॉक्रसी’ हा शब्द सर्वप्रथम अस्तित्वात आला. ‘डेमॉस’ म्हणजे लोक आणि ‘क्राटोस’ म्हणजे सत्ता. म्हणजेच लोकांच्या हाती सत्ता, हीच खरी लोकशाहीची व्याख्या आहे. प्राचीन ग्रीसच्या अथेन्स नगरराज्यात नागरिक थेट शासन प्रक्रियेत सहभागी होत असत. लोकांच्या चर्चेतून, वादविवादातून, एकमताने निर्णय घेण्याच्या परंपरेतून लोकशाहीची बीजे रुजली आहेत. तथापि आधुनिक अर्थाने लोकशाहीचा पाया अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध, फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात रचला गेला. फ्रेंच क्रांतीत उच्चारित झालेली “स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता” ही घोषणा आजही जगभरातील लोकशाहीची प्राणप्रतिज्ञा मानली जाते.

आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा केवळ औपचारिक उत्सव नाही तर आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाचा उद्देश हा जगातील नागरिकांना लोकशाहीची खरी जाणीव करून देणे हा आहे. लोकशाही ही मिळविलेली संपत्ती आहे, परंतु ती टिकविण्यासाठी सतत प्रयत्नांची गरज असते. कारण लोकशाही ही स्थिर राहणारी नसून सतत बदलणाऱ्या परिस्थितीशी सुसंगत ठेवावी लागते. हा दिवस लोकशाहीला भेडसावणाऱ्या संकटांची जाणीव करून देतो. आजच्या काळात जगभरात लोकशाहीसमोर अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत. जगातील काही देशांत अजूनही हुकूमशाहीचे सावट आहे, काही ठिकाणी निवडणुका होतात, परंतु त्या फक्त नावापुरत्या असतात, तर काही ठिकाणी मतभिन्नतेला दडपले जाते. माध्यमांवर बंधने, नागरिकांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध, अल्पसंख्यांकांवर अन्याय, महिलांची उपेक्षा, दहशतवाद, भ्रष्टाचार, आर्थिक असमानता, धार्मिक कट्टरता, डिजिटल माध्यमांवरील नियंत्रण, सामाजिक विषमता या सर्व गोष्टी लोकशाहीच्या पायाभूत मूल्यांना आव्हान देतात. लोकशाहीचे संरक्षण करणे ही जगातील सर्व नागरिकांची, समाजाची आणि शासनव्यवस्थेची जबाबदारी आहे.

भारतीय संदर्भात लोकशाही हा आपल्या राष्ट्रीय अस्मितेचा अभिमान आहे. 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 26 जानेवारी 1950 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्यासाठी लिहिलेले भारतीय संविधान लागू झाले आणि भारताने स्वतःला सार्वभौम लोकशाही गणराज्य म्हणून घोषित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडविलेले भारतीय संविधान हे जगातील सर्वांत मोठे लिखित संविधान आहे. भारतीय संविधान हे केवळ कायद्याचे दस्तऐवज नाही, तर लोकशाहीच्या मूल्यांचा जाहीरनामा आहे. भारतीय संविधानाने सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराची हमी दिली, सार्वत्रिक प्रौढ मताधिकारामुळे जात, धर्म, लिंग, भाषा, संपत्ती, शिक्षण या कोणत्याही बंधनांशिवाय प्रत्येक प्रौढ नागरिकाला मतदानाचा हक्क मिळाला आहे. हा अधिकार भारतीय लोकशाहीचा कणा असून भारतीय लोकशाहीची सर्वात मोठी ताकद आहे. त्यामुळे भारत आज जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून ओळखले जाते.

लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका नव्हेत तर लोकशाही म्हणजे नागरिकांचा सातत्याने सहभाग होय. संसद, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था या सर्व पातळ्यांवर नागरिकांचा सहभाग घडवून आणणे ही खरी लोकशाही आहे. माहितीचा अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, पत्रकारितेची स्वायत्तता, स्वतंत्र न्यायव्यवस्था, सामाजिक संस्थांची भूमिका आणि विविधतेचा स्वीकार ही लोकशाहीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. तथापि भारतासारख्या विशाल देशात लोकशाही टिकविणे हे सोपे काम नसून आज भारतीय लोकशाही समोर अनेक आव्हाने आहेत. निवडणुकांमध्ये पैसा आणि सत्तेचा दुरुपयोग, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींचा राजकारणात प्रवेश, मतदारांना फसविणारी आश्वासने, जातीय आणि धार्मिक ध्रुवीकरण, ग्रामीण व शहरी भागातील दरी, महिलांचे आणि अल्पसंख्यांकांचे अपुरे प्रतिनिधित्व, शिक्षण व माहितीच्या अभावामुळे नागरिकांचा मर्यादित सहभाग या सर्व समस्या लोकशाहीला कमकुवत करतात. लोकशाही टिकवण्यासाठी समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून व्यापक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता लोकशाहीचा पाया सामाजिक न्यायात आहे. लोकशाहीचा खरा अर्थ म्हणजे माणसामाणसातील विषमता नष्ट करणे. लोकशाहीमध्ये प्रत्येक माणूस समान आहे, ही संकल्पना केवळ कायद्यातील शब्द नसून सामाजिक जीवनातील आचार बनली पाहिजे. जातीय, धार्मिक, लैंगिक, भाषिक आणि वर्गीय भेदभाव जर टिकून राहिला तर लोकशाही अपुरी ठरते. त्यामुळे समाजातील वंचित घटकांना संधी उपलब्ध करून देणे, महिलांना समान हक्क देणे, अल्पसंख्यांकांचा सन्मान राखणे आणि समाजातील विषमता कमी करणे हे लोकशाहीच्या टिकावासाठी आवश्यक आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या संविधानामध्ये सामाजिक न्यायाचे तत्त्व मांडले आहे. आरक्षण धोरण, अल्पसंख्यांकांच्या संरक्षणासाठीचे विशेष कायदे, महिलांसाठीच्या योजना, वंचित घटकांना सशक्त करण्यासाठीचे प्रयत्न हे सर्व लोकशाहीचे सामाजिक अंग आहे.

आर्थिक बाजूने लोकशाहीचा विचार केल्यास लोकशाही तेव्हाच अर्थपूर्ण ठरते जेव्हा प्रत्येक नागरिकाला समान संधी उपलब्ध होतात. लोकशाहीमध्ये ‘संधींची समानता’ ही सर्वात महत्त्वाची बाब ठरते. शिक्षण, आरोग्य, रोजगार, सामाजिक सुरक्षा यांची उपलब्धता जर सर्वांना समान प्रमाणात नसेल तर लोकशाही केवळ नावापुरती राहते. आर्थिक विषमता वाढल्यास लोकशाहीचा पाया हलतो. काही लोक अत्यंत श्रीमंत आणि काही अत्यंत गरीब राहिले तर समानतेचा विचार केवळ कागदोपत्री उरतो. त्यामुळे लोकशाही टिकवण्यासाठी आर्थिक न्याय साध्य करणे अनिवार्य आहे. जागतिकीकरण आणि उदारीकरणामुळे आर्थिक विकास झाला असला तरी गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी वाढत चालली आहे. ही दरी लोकशाहीच्या अस्तित्वालाच धोकादायक ठरू शकते. त्यामुळे आर्थिक न्याय साध्य करणे, संसाधनांचे समान वितरण करणे, वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे.

सांस्कृतिक अंगाने लोकशाही ही विविधतेचा उत्सव आहे. भारतासारख्या देशात धर्म, भाषा, प्रथा, परंपरा, संस्कृती यांचे प्रचंड वैविध्य आहे. या विविधतेला सन्मान देणे, भिन्न संस्कृतींना समान स्थान मिळवून देणे, परस्पर संवाद साधणे हे लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे. लोकशाहीमध्ये केवळ बहुसंख्यांकांचा आवाज नव्हे, तर प्रत्येक घटकाचा आवाज महत्त्वाचा असतो. लोकशाही म्हणजे एकच विचार सर्वांवर लादणे नव्हे, तर भिन्न विचारांना व संस्कृतींना समान आदर देणे होय.

आजच्या डिजिटल युगात लोकशाहीसमोर नवे प्रश्न उभे राहिले आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून माहिती सर्वांपर्यंत झपाट्याने पोहोचत आहे त्यामुळे लोकशाहीमध्ये नागरिकांचा सहभाग वाढला असून आंदोलनांना गती मिळत आहे. परंतु याच माध्यमातून खोटी माहिती, द्वेषपूर्ण प्रचार, ट्रोलिंग, मतप्रभावीत करणाऱ्या मोहिमा यामुळे लोकशाहीची गुणवत्ता धोक्यात येत आहे. माहितीच्या प्रसारात जबाबदारी आणि माध्यम साक्षरता ही लोकशाहीच्या भविष्यासाठी अत्यावश्यक आहेत.

आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नाही तर तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे, की आपण नागरिक म्हणून लोकशाही जपण्यासाठी किती प्रयत्न करतो आहोत? आपण आपल्या अधिकारांसोबत जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवतो का? आपण भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवतो का? आपण निवडणुकीत मतदान करतो का? आपण समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतो का? हे प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची हीच वेळ आहे. आपण नागरिक म्हणून लोकशाही जपण्यासाठी काय करत आहोत. मतदान करणे ही आपली मूलभूत जबाबदारी आहे. परंतु लोकशाही म्हणजे फक्त मतदान नव्हे, तर सातत्याने शासन प्रक्रियेत सहभाग घेणे आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवणे, अन्यायग्रस्तांना साथ देणे, सामाजिक चळवळींमध्ये सहभाग घेणे, प्रशासनावर लक्ष ठेवणे ही सर्व कामे प्रत्येक नागरिकाने करणे आवश्यक आहे.

तरुण पिढी ही लोकशाहीची खरी आशा आहे. तरुणांमध्ये ऊर्जा, नव्या कल्पना, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि बदल घडवून आणण्याची क्षमता आहे. शिक्षण, रोजगार, तंत्रज्ञान, सामाजिक माध्यमे या सर्व क्षेत्रांतून तरुणांनी लोकशाही अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून तरुणांना लोकशाही मूल्यांचे भान करून देणे हे शिक्षणव्यवस्थेचेही कर्तव्य आहे.

एकूणच, लोकशाही म्हणजे संघर्ष, संवाद, सहभाग आणि जबाबदारी यांचा संगम आहे. आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा आपल्याला या मूल्यांची आठवण करून देतो. लोकशाही ही एक प्रवाही प्रक्रिया आहे; ती स्थिर मिळकत नाही. तिला सतत जपावे लागते, अन्यायाविरुद्ध लढावे लागते, नागरिकांनी सजग राहावे लागते. लोकशाहीचे रक्षण हे केवळ सरकारचे नव्हे तर प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. समानता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या त्रिसूत्रीवर उभारलेली ही व्यवस्था जगातील प्रत्येक माणसासाठी आशेचा दीप आहे.

म्हणूनच आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाचे स्मरण करताना आपण प्रत्येकाने लोकशाहीच्या मूल्यांना आत्मसात करणे, त्यांचा प्रसार करणे आणि भावी पिढ्यांसाठी ती अधिक सक्षम ठेवणे हेच खरे कर्तव्य आहे. लोकशाही म्हणजे मानवी संस्कृतीचे सर्वोच्च मूल्य, समानतेचे आश्वासन, स्वातंत्र्याची हमी आणि बंधुत्वाचा आधार आहे. हा दिवस म्हणजे त्या तेजस्वी दीपाची आठवण, जो जगाला अधिक न्याय्य, समतोल आणि मानवतावादी बनविण्यासाठी प्रज्वलित आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. 9960103582,**
**ईमेल —**
**bagate.rajendra४@gmail.com**